कर्मचारीवर्ग शाखा
परिपत्रक क्र. २२/१९९५

क्र. राप/आस्था/९०८-जीई/४१८५
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक : २० . ७. १९९५

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई / मुंबई / धुळे / जळगांव / नाशिक / पालघर / रायगड(पेण) / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / अकोला / अमरावती / भंडारा / बुलढाणा / चंद्रपूर / वर्धा / यवतमाळ.

विषय :- रोजंदारीवर काम करणाऱ्या चालक व वाहकांना नियमित वेतन श्रेणीत नेमणूक देण्याबाबत.

...

संचालक मंडळाने ठराव क्र. ९५.०८.०९ दिनांक ४ जुलै १९९५ नुसार आता असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, दरवर्षी जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात चालविण्यात आलेली सरासरी नियते आधारभूत धरून ९५४ रोजंदारीवरील चालक व वाहक नियमित वेतन श्रेणीत सामावून घ्यावेत. संचालक मंडळाच्या ह्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने वाहतूक उपरोक्त विषयावर प्रसारीत करण्यात आलेली सर्व परिपत्रके / सुचना / पत्रे रद्दबातल करण्यात येत आहेत.

रोजंदारीवर काम करणाऱ्या ९५४ चालक / वाहकांना नियमित वेतन श्रेणीत नेमणूक देतांना खालील शर्ती व अटी चे पालन करावे.

[१] दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नियमित वेतन श्रेणीत नेमणूक दिल्याबाबतचे आदेश प्रसारित करावेत. सदर आदेशाचा अंमल १ ऑक्टोबर या तारखेपासून राहील.

[२] सदरचे चालक / वाहक सक्षम निवड समितीने निवड केलेले असावेत.

[३] निवड समितीने गुणवत्तेनुसार तयार केलेल्या निवड यादीवरील अनुक्रमांनुसार नियमित वेतनश्रेणीवर घेण्यासाठी विचार करावा.

[४] थेट भरतीसाठी शासनाने विहीत केलेल्या नामावलीतील बिंदू विचारात घेऊन निवड केलेल्या व रोजंदारीवर काम करीत असलेल्या चालक व वाहकांचे नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्याचे आदेश काढावेत.

[५] नियमित वेतन श्रेणीत चालक / वाहक घेतल्यानंतर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन राहतील.

[६] प्रथम निवड करण्यात आलेल्या चालक / वाहकांचा नियमित वेतन श्रेणीवर घेण्याचा हक्क प्रथम राहील.

[७] चालक / वाहकांना नियमित वेतन श्रेणीत घेण्याचे आदेश नियुक्ती प्राधिकारी प्रसारीत करतील.